# पुनर्वसन शाखा

## कार्यालयाचे नाव- पुनर्वसन शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे विभाग, पुणे (०१/०१/२०२५)

| अ.क्र. | सेवांचा तपशील | सेवा पुरविणारे अधिकारी/कर्मचारी यांचे नाव व हुद्दा | | सेवा पुरविण्याची विहीत मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे नाव व हुद्दा |
|---|---|---|---|---|---|
| १ | १)ज्या पाटबंधारे प्रकल्पास पुनर्वसन अधिनियम,१९९९ मधील कलम ११(१) च्या तरतुदी लागु होतात अशा प्रकल्पांचे बाधित व लाभ परिमंडल जाहीर करण्यासाठी कलम ११(१) ची अधिसूचना आयुक्तांच्या मान्यतेने शासन राजपत्रात प्रसिध्द करणे.<br>२) प्रकल्पबाधित व्यक्तींच्या नवीन अथवा विस्तारित पुनर्वसित गावठाणात विहीत देय नागरी सुविधांच्या खर्चाच्या अंदाजपत्रकांना छाननीअंती प्रशासकीय मान्यता देणेबाबतचे प्रस्ताव मा.आयुक्त यांना सादर करणे व मंजूरीअंती आदेश पारीत करणे.<br>३) जमिनी विक्री देणेकामी प्राप्त झालेल्या प्रस्तांवांची महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम खंड-२ परिच्छेद ७८ नुसार छाननीअंती योग्य असलेल्या प्रस्तावांना मान्यता देणेसाठी मा.विभागीय आयुक्त यांचेकडे सादर करणे व मंजूरीअंती आदेश पारित करणे.<br>४) प्रकल्पग्रस्तास नवीन व अविभाज्य शर्तीवर प्रदान करण्यात आलेल्या जमिनीचे ७/१२ चे इतर हक्कातील नवीन व अविभाज्य शर्तीवर प्रदान असा दाखल केलेला शेराकमी करणेकामी प्राप्त झालेल्या प्रस्तावांची शासन निर्णय क्र.आरपीए २००४/प्र.क्र.९१/र-१,दि.११/६/२००४ नुसार छाननीअंती योग्य असलेल्या प्रस्तावांना मान्यता देणेसाठी मा. विभागीय आयुक्त यांचेकडे सादर करणे व मंजुरीअंती आदेश पारित करणे.<br>५) ज्या प्रकल्पग्रस्तांना नवीन व अविभाज्य शर्तीवर प्रदान करण्यात आलेला जमीन /भूखंड,त्यांनी शासनाची पूर्वपरवानगी न घेता लागलीच रितसर दस्तऐवज | श्रीमती समिक्षा चंद्राकर<br>श्री चंद्रशेखर सानप<br>श्रीमती शशिकला कोकाटे<br>श्रीमती शितल घाडगे<br>श्री.सुनिल शिंदे<br>श्री.मनोज करांडे | (प्रभारी) सह आयुक्त (पुनर्वसन)<br>कार्यालय अधिक्षक तथा तहसिलदार<br>उपलेखापाल<br>अव्वल कारकून<br>लघु टंकलेखक<br>महसूल सहायक | शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन करण्यासाठी आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध करण्यासाठी तरतूद अधिनियम क्र. २१/२००६ अन्वये सदर प्रकरणाबाबत ४५ दिवसांचया आत निर्णय घेऊन योग्य ती अंतिम कार्यवाही करून संबंधितांना कळविणे | मा. विभागीय आयुक्त पुणे विभाग पुणे |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | करून दुसऱ्यास विक्री केली असेल व त्यामुळे शर्तभंग होत असेल, असा शर्तभंग नियमानुकूल करणेकामी प्रापत झालेला प्रस्ताव शासन,महसूल व वन विभागाकडील परिपत्रक क्र.आरपीए २००४/प्र.क्र.२९१/र-१,दि. २४/१२/२००४ नुसार छाननीअंती योग्य असलेल्या प्रस्तावांना मान्यता देणेसाठी मा.विभागीय आयुक्त यांचेकडे सादर करणे व मंजूरी अंती आदेश पारित करणे.<br>६) प्रकल्पाच्या लाभ परिमंडलातील ज्या लाभधारकांनी उच्च न्यायालय/सर्वोच्च न्यायालयात जमीन संपादनातून वगळणेसंदर्भात जी अपिले दाखल केलेली आहेत. अशा अपिलांमध्ये उच्च /सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार फेरसुनावणी घेऊन अपिले निकाली काढणेसाठी मा. आयुक्त यांचेकडे सुनावणीसाठी उपस्थित राहणे.<br>७) प्रधान लेखाशीर्ष २२३५,४२३५,६२३५,४७०१,४८०१ व २०४९ या खाली विभागाची एकत्रित अर्थसंकल्पीय अंदाजपत्रके शासनास विहीत मुदतीत सादर करणे. तसेच, अर्थसकंल्पीय अंदाजपत्रकानुसार शासनाकडुन प्राप्त झालेले अनुदानाचे वाटप जिल्हाधिकारी व प्रकल्प अधिकारी यांना वेळेत वाटप करणे | | | | |

१) २२३५- payment of staff / social security and welfare
२) ४२३५- capital outlay on social and welfare
३) ६२३५- land for social security and welfare
४) ४७०१- capital outlay on medium irrigation
५) ४८०१- capital outlay on power projects
६) २०४९- intrest of payments

(समिक्षा चंद्राकर)
प्रभारी सह आयुक्त (पुनर्वसन)
पुणे विभाग पुणे